# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग


पत्र

विषयः- **वनजमीन रायगड.**

पुनःस्थापीत खाजगी वनक्षेत्रामध्ये वनेत्तर कामे करणेसाठी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत क्षेत्र मागणी प्रस्ताव. मौजे जांभिवली ता. पनवेल स.क्र. 121/अ2 क्षेत्र 9.78 हेक्टर. मे. साई एन्टरप्रायझेस, पाली, सुधागड, रायगड.

जा. क्र. ब/20/जमीन/ 913 /2018-19.

अलिबाग 402 201. दिनांकः 4 / 6 /2018.

प्रति,

श्री. संदीप सुरेश दपके,
साई एन्टरप्रायझेस, पाली सुधागड
प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता श्री. कानजी करमशी पटेल व इतर 2

संदर्भः- आपलेकडील पत्र दिनांक 16/05/2018.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपण मौजे जांभिवली स. क्र. 121/अ2 पुनःस्थापीत खाजगी वनक्षेत्र 9.78 हेक्टर मध्ये वनेत्तर कामे करणेसाठी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्ताव 3 प्रतीत या कार्यालयास दाखल केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी असल्याचे दिसून येत आहेत.

1) प्रस्तावासोबत नमूद स.क्र. 121/अ/2 चे संबंधात मुळ गाव बामणोली ता. पनवेल व नवीन गाव मौजे जांभिवली ता. पनवेल चे मागणी केलेले क्षेत्र विविध रंगसंगतीने दर्शविलेले नाही.

2) पुनःस्थापीत क्षेत्राचे उप जिल्हाधिकारी (खाजगी वने) यांचे आदेशाची प्रत प्रस्तावांत समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

3) प्रस्तावीत क्षेत्र स.क्र. 121/अ/2 ची उप अधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडील साक्षांकीत गट स्किम व गटबुक नकाशा प्रस्तावांत समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

4) 1:50000 या प्रमाणातील टोपोशीट नकाशावर सदर मागणी दर्शवून त्याचे अक्षांश/रेखांश दर्शवावे आणि अभयारण्यापासूनचे अंतर दर्शविणे आवश्यक आहे.

5) मागणी क्षेत्राचे नकाशाचे केएमएल फाईल ची सीडी प्रस्तावासोबत समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

6) सदर स.क्र. 121/अ/2 लगत वनक्षेत्र असल्याने सदर स.क्र. 121/अ/2 मध्ये वनेत्तर कामे करणेपूर्वी भुमि अभिलेख विभाग व वनविभाग यांचे संयुक्त सर्व्हेक्षण होणे आवश्यक आहे.

7) प्रस्तावांत प्रोजेक्ट नोट मध्ये प्रस्तावीत क्षेत्रामध्ये करणेत येणारे वनेत्तर बाबींबाबत थोडक्यांत परंतु व्यवस्थित ऊहापोह करणे आवश्यक राहील.

8) पान क्र. 20 वरील प्रमाणपत्र चुकीचे दिलेले आहे, त्यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

9) प्रस्तावांत वनहक्क कायदा-2006 अंतर्गत जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करून दिलेले नाही.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्तावाचे 8 संच या कार्यालयात दाखल करणेस विनंती आहे.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, अलिबाग व परिक्षेत्र वन अधिकारी पेण यांचेकडे माहिती व वनक्षेत्रांत कोणतेही विनापरवानगी वनेत्तर काम होणार नाही याची दक्षता घेणेसाठी रवाना. तसेच प्रकरणी वृक्षतोड होणार असल्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रक (आंग्ल भाषेत) तसेच या कार्यालयात तात्काळ सादर करावे.